वर्ष-०८ | अंक-४२ | मुंबई, मंगळवार ०६ ते १२ सप्टेंबर - २०२२ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

• संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 द्राक्षावरील रोग व कीड नियंत्रण

3 → मुंबईतील तिहेरी बॉम्बस्फोट प्रकरण, सत्र न्यायालयाने फेटाळला आरोपी विरोधातील पोलिसांचा अर्ज

जवाहिराचे दुकानातील दागिने लूटणाऱ्यांना नालासोपारा, गुजरातमधून अटक ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

# चर्चमध्ये तीन मुलींवर लैंगिक अत्याचार

## नवी मुंबईच्या सीवूडमधील धक्कादायक प्रकार; पास्टरवर पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल



नवी मुंबई : नवी मुंबईतील सीवूडमध्ये असलेल्या बेथेल गस्पेल चॅरिटेबल ट्रस्टच्या चर्चमधील आणखी तीन मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या चर्चमध्ये असलेल्या अनधिकृत आश्रम शाळेवर महिला व बालविकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी महिन्याभरापूर्वी धाड टाकत तेथून 45 मुला मुलींची सुटका केली होती. यापैकी तीन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याप्रकरणी मागील महिन्यातच पास्टर राजकुमार येसुदासनवर गुन्हा ...पान २ वर...

# शिक्षक दिनी एकनाथ शिंदे यांचा शिक्षकांसाठी मोठा निर्णय

मुंबई : शिक्षक दिन साजरा केला जात आहे. त्याच दिवशी शिक्षकांसाठी एक अतिशय महत्वाची बातमी आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिक्षकांसाठी मोठे निर्णय घेतले आहेत. यापुढे शिक्षकांवरील शाळाबाह्य कामांचं ओझं कमी होणार आहे.

शिक्षक शाळेव्यतिरिक्त शासनाची जी कामं करतात त्यावर अंकुश लागणार आहे. तसंच शिक्षकांचे पगार वेळेवर होणार आहेत. सर्वात महत्वाचं म्हणजे शिक्षक पुरस्कार सोहळा बंद करण्यात आला होता तो सोहळा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय एकनाथ शिंदे सरकारनं घेतला आहे. या सोहळयाला मुख्यमंत्री स्वत: उपस्थित राहणार आहेत.



राज्यातील शिक्षकांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. कोरोना काळात विद्यार्थ्यांमध्ये ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून अभ्यासाची गोडी निर्माण करण्याचा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले. शिक्षकांचे वेतन त्यांच्या खात्यात वेळेवर जमा होतील यासाठी दक्षता घेण्याच्या सूचना विभागाला देताना केंद्र प्रमुखांच्या रिक्त जागा लवकरच भरल्या जातील त्याचबरोबर शिक्षक पुरस्कार प्रदान सोहळा लवकरच आयोजित केला जाईल असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. भिवंडी, सिंधुदूर्ग, पुणे, सोलापूर, नाशिक, नंदूरबार, औरंगाबाद, हिंगोली, अमरावती, नागपूर, गडचिरोली, वाशीम, उस्मानाबाद, वर्धा, येथील शिक्षकांनी मुख्यमंत्र्यांशी संवाद साधला.

# शिवसेनेकडून रमेश लटके यांच्या पत्नीला उमेदवारी

मुंबई : अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघातून पोटनिवडणुकीसाठी दिवगंत आमदार रमेश लटके यांच्या पत्नी ऋतुजा लटके यांना उमेदवारी देण्यात आली आहे.अंधेरी पूर्वेतील शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यावेळेस उद्धव ठाकरे यांनी ऋतुजा लटके यांना उमेदवारी जाहीर केली. रमेश लटके याचं 12 मे रोजी दुबईत हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं. तेव्हापासून मतदारसंघ रिक्त आहे.



### भाजपकडून मुरजी पटेल रिंगणात

भाजपकडूनही या पोटनिवडणुकासाठी उमेदवार दिला जाणार आहे. भाजपकडून मुरजी पटेल यांना उमेदवारी मिळणार आहे. विशेष म्हणजे या पोटनिवडणुकीची जबाबदारी भाजप मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांना देण्यात आली आहे.

### कोण आहेत मुरजी पटेल?

पटेल हे भाजपचे माजी नगरसेवक राहिले आहेत. पटेल 2019 मध्ये लटके यांच्याविरोधात अपक्ष उमेदवार म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. राज्यात 2019 मध्ये शिवसेना-भाजप यूती जाहीर झाली होती. त्यामुळे अंधेरी पूर्व विधानसभेची जागा ही शिवसेनेच्या वाट्याला गेली होती. त्यामुळे पटेल यांनी बंडखोरी करत अपक्ष निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत रमेश लटके यांनी पटेल यांचा 16 हजार 965 इतक्या मतांच्या फरकाने विजय मिळवला होता. मात्र उल्लेखनीय बाब अशी की अपक्ष निवडणूक लढवूनही पटेल यांनी दुसऱ्या क्रमांकाची मतं घेतली होती. पटेल यांना 45 हजार 808 मतं मिळाली होती. पटेल 'जीवन ज्योत प्रतिष्ठान' या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून घराघरात पोहचले आहेत.

## संजय राऊतांना दिलासा नाहीच

# ईडी कोठडीत पुन्हा वाढ!



मुंबई : संजय राऊत यांच्या ईडी कोठडीत वाढ करण्यात आलीय. 14 दिवसांनी संजय राऊत यांची ईडी कोठडी वाढवण्यात आली आहे. त्यामुळे संजय राऊत यांचा ईडी कोठडीतील मुक्काम 19 सप्टेंबरपर्यंत लांबला आहे. पत्रा चाळ घोटाळाप्रकरणी संजय राऊत यांना ईडीने अटक केली होती. त्यानंतर संजय राऊतांच्या ईडी कोठडीत पुन्हा एकदा वाढ करण्यात आल्याचं पाहायल मिळालंय. 1 ऑगस्ट रोजी शिवसेनेचे राज्यसभा खासदार संजय राऊत यांना ईडीने अटक केली होती. आता महिला उलटून गेला, ...पान २ वर...

# चिपळूणातील एटीएम मशीन फोडणारी टोळी जेरबंद

## रत्नागिरी पोलिसांनी आरोपींना गोव्यात पकडले



विरार : गुन्हे शाखा, कक्ष-३ विरार यांनी सोन्याची नाणी सांगून पितळी धातूची नाणे देवून फसवणूक करणाऱ्या टोळीला अटक केली .मिळालेल्या माहितीनुसार दिनांक २५/०७/२०२२ रोजी संध्याकाळच्या वेळेस सुनिल प्रविणचंद्र चोक्सी यांना एका अनोळखी व्यक्तीने पंचवटी हॉटेल जवळील भाजी मार्केट वसई (पश्चिम) येथे भेटून त्याच्या जवळ ५ किलो सोन्याचे पाने आहेत असे सांगून त्यांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडील १२,००,०००/- रुपये रोख रक्कम त्यांना देण्यास भाग पाडुन चोक्सी यांना सोन्याचे पाने न देता पितळी धातुचे पाने देवुन त्यांची फसवणूक करून पळुन गेला होता. सदरबाबत चोक्सी यांनी अज्ञात आरोपी विरुध्द दिलेल्या तक्रारीवरून वालीव पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात जमीनीत गाडलेले पुरातन सोन्याचे नाणे मिळालेले आहे असे भासवुन ते कमी किंमतीत विक्री करण्याचा बहाणा करुन नागरिकांची फसवणुक करण्या-या गुन्हयांमध्ये दिवसेंदिवस वाढ झाली होती. सदर

गुन्हयांची वरिष्ठांनी गांभीर्याने दखल घेवुन अश्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी व आरोपीचा शोध घेण्याबाबत ...पान २ वर...

# डोंबिवलीत गणपती विसर्जन मिरवणूक ; मार्गावरील खड्डे भरणीची कामे सुरू



गणपती विसर्जन मिरवणूक मार्गावर एकही खड्डा असू नये म्हणून डोंबिवलीतील सर्व विसर्जन मार्गावरील रस्त्यांवरील लहान खड्डे भरणीची कामे बांधकाम विभागाने सुरू केली आहेत. मनसेने दोन दिवसापूर्वी बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन विसर्जन मिरवणुक मार्गावर एकही खड्डा दिसणार नाही याची काळजी घेण्याची मागणी बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडे केली होती. शुक्रवारी अनंत चतुर्थीच्या दिवशी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे गणपती अधिक संख्येने मोठ्या चारचाकी आसनांवरुन खाडी किनारी नेण्यात येणार आहेत. त्यामुळे ...पान २ वर...

# ब्लॅकमेल करून महिला वकिलावर अत्याचार, दोघांविरूद्ध गुन्हा दाखल

नागपूर: वकीलाने ब्लॅकमेल करीत सहकारी महिला वकिलावरच वारंवार अत्याचार केल्याचे खळबळजणक प्रकरण पुढे आले आहे. या प्रकरणी गिट्टीखदान पोलिसांनीवकीलासह त्याच्या मित्राविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. कमलेश वाघदरे (46, रा. सोनेगाव) आणि त्याचा मित्र आदित्य चौधरी अशी आरोपींची नावे सांगण्यात येतात. कमलेश आणि आकारनगर येथील रहिवासी 46 वर्षीय महिला दोघेही पेशाने वकिल आहेत. दोघेही जिल्हा व सत्र न्यायालयात सराव करतात. यामुळे एकमेकांचे परिचितही आहेत. कमलेश अनेकदा पीडितेच्या घरी जायचा. याच दरम्यान कमलेशने तिचे अश्लील फोटो काढून ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली, असा पीडितेचा आरोप आहे. 24 मार्च 2014 ते 27 मार्च



2022 दरम्यान घरी आणि कार्यालयात वारंवार अत्याचार केला.

पतीला जीवे मारण्याची धमकी

कमलेशने तिला अनैसर्गिक शारीरिक संबंध ठेवण्यास भाग पाडल्याचाही पीडितेचा आरोप आहे. विरोध केल्यास कमलेश जातीवाचक शिवीगाळही करायचा. कमलेशचा मित्र आदित्य यानेही पीडितेच्या घराखाली येऊन तिला शिवीगाळ केली. आदित्यने गुंड आणून तिच्या पतीला मारहाण केली आणि तिच्या मुलीला घरातून पळवून नेण्याची धमकी दिल्याचाही आरोप आहे. तसेच संपूर्ण कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी दिली. पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी कमलेश आणि आदित्यविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल ...पान २ वर...

# विजेच्या धक्क्याने तरूणाचा मृत्यू ; रोहित्राशी छेडछाड करणे जीवावर बेतले



उल्हासनगरच्या कॅम्प चार येथील एनसीटी शाळेच्या जवळ असलेल्या विजेच्या रोहित्राच्या ( ट्रान्सफॉर्मर ) संपर्कात आल्याने एका २५ वर्षीय तरूणाचा विजेच्या धक्क्याने जागीच मृत्यू झाला.

घटनास्थळाजवळच्याच परिसरात हा तरूण राहत होता. तो या रोहित्राच्या संरक्षण जाळीच्या आत कसा गेला याबाबत माहिती मिळू शकली नाही. मात्र या तरूणाने रोहित्राला बसवलेली एक कळ काढण्याचा प्रयत्न केला त्यात त्याला विजेचा धक्का लागला असावा अशी शक्यता महावितरणाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. उल्हासनगरातील कॅम्प चार परिसरात एनसीटी शाळेजवळ असलेल्या रस्त्यालगत रोहित्र आहे. येथील महापालिकेच्या शाळा क्रमांक १४ च्या परिसरात राहणाऱ्या सागर बोदडे या २५ वर्षीय तरूणाला रोहित्रचा विजेचा जोरदार धक्का लागला. या धक्क्यात त्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच सागरच्या कुटूंबियांनी आणि पोलिसांनी महावितरण अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर सागर बोदडे याचा मृतदेह उल्हासनगर मध्यवर्ती रूग्णालयात पाठवण्यात आला. यावेळी रोहित्रातील एक कळ काढण्यात आल्याचे निदर्शनास आल्याची माहिती महावितरणचे विभागीय अभियंता अशोक नरवडे यांनी ...पान २ वर...

# मंगला एक्सप्रेसमध्ये विसरलेला मोबाईल कसारा रेल्वे पोलिसांकडून प्रवाशाला परत

मुंबईहून मंगला एक्सप्रेसमधून प्रवास करत टिटवाळा येथील एक महिला कल्याण रेल्वे स्थानकात घाई गडबडीत उतरली. यावेळी ही महिला एक्सप्रेसमध्ये आसनावर ठेवलेला आपला मोबाईल घेण्यास विसरली. कल्याण रेल्वे स्थानकात फलाट बदलत असताना या महिलेला आपला मोबाईल एक्सप्रेस मध्ये विसरल्याचे लक्षात आले. या महिलेने तात्काळ कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्यात धाव घेतली. घडला प्रकार सांगितला. पोलिसांनी तातडीने कसारा रेल्वे पोलिसांना ही माहिती दिली. कसारा येथे मंगला एक्सप्रेस थांबताच तेथील पोलिसांनी एक्सप्रेसमध्ये विसरलेला महिलेचा मोबाईल ताब्यात घेतला. त्या महिलेला ओळख पटवून मोबाईल परत केला. कल्याण ते कसारा रेल्वे स्थानकांच्या



दरम्यान शुक्रवारी दुपारी ही घटना घडली. टिटवाळा येथे राहणारी एक महिला कमल रामचंद्र कदम या मुंबईतून मंगला एक्सप्रेसने कल्याण रेल्वे स्थानकात उतरल्या. त्यांच्या दोन्ही हातात सामानाच्या पिशव्या होतात. एक्सप्रेसमध्ये आसनावर बसलेल्या असताना त्यांनी मोबाईल आसनावर बाजुला ठेवला. उतरताना घेऊ असा विचार त्यांनी केला. कल्याण रेल्वे स्थानकात एक्सप्रेसमध्ये चढणाऱ्या प्रवाशांची गर्दी असल्याने शुक्रवारी दुपारी मंगला एक्सप्रेस मधून त्या घाई गडबडीत कल्याण स्थानकात उतरल्या. जिने चढत असताना त्यांना मोबाईल आपल्या पिशव्यांमध्ये नसल्याचे दिसले. आपण मोबाईल एक्सप्रेसच्या आसनावर विसरलो याची जाणीव त्यांना झाली. कमल कदम यांनी तात्काळ कल्याण लोहमार्ग पोलीस ठाणे गाठले. तेथे त्यांनी आपला मोबाईल मंगला एक्सप्रेस मध्ये विसरल्याचे सांगितले.रेल्वे पोलिसाने तात्काळ कसारा रेल्वे पोलिसांना संपर्क करुन मंगला एक्सप्रेस कसारा स्थानकात थांबल्यावर डबा एस एक मध्ये एका महिलेचा मोबाईल चार्जरसह विसरला आहे. तो ताब्यात घेण्याची सूचना केली.

ही माहिती मिळताच मंगला एक्सप्रेस कसारा स्थानकात येण्याची वेळ होताच कसारा रेल्वे स्थानकातील हवालदार पी. एस. राजेभोसले, के. एम. गायकवाड, गृहरक्षक पी. एल. राठोड, एस. बी. कामडी, एल. पी. जाधव एक्सप्रेसचा डबा थांबणाऱ्या भागात उभे राहिले. एक्सप्रेस कसारा स्थानकात येताच पोलिसांचे तपासी पथक तात्काळ डब्यात चढले. त्यांनी एक मोबाईल चार्जरसह विसरला असल्याची माहिती प्रवाशांना दिली. त्यावेळी बाजुच्या ...पान २ वर...

# नोकरीचे आमिष दाखवून डोंबिवलीत विद्यार्थीनींची फसवणूक




महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या एका तरुणीला अर्धवेळ नोकरीचे आमिष दाखवून ऑनलाईन प्रणालीतून भामट्याने विद्यार्थिनीची दोन लाख २६ हजार रुपयांची फसवणूक केली आहे. नोकरी नाहीच, पण घेतलेले पैसे परत मिळणार नाहीत याची खात्री झाल्यावर तरुणीने मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करुन तपास सुरू केला आहे. पूजा चिमाजी यादव (२०, सिध्दी पार्क, देशमुख होम्स, टाटा पाॅवर, कल्याण पूर्व) असे तक्रारदार तरुणीचे नाव आहे. पूजा ही महाविद्यालयीन शिक्षण घेते. शिक्षण घेत असताना अर्धवेळ नोकरी करावी म्हणून पूजा कंपनी, खासगी एजन्सीमध्ये काम शोधत आहे. यासाठी ती ऑनलाईन, वर्तमानपत्रातील जाहिराती बघते. अशाच एका संपर्कातून पूजा यादवला एका भामट्याने टेलिग्रॅम उपयोजन वरुन संपर्क केला. तिला अर्धवेळ नोकरी देण्याचे आमिष दाखवले. काम मिळण्याची प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी काही रक्कम तुला भरावी लागेल असे सांगून भामट्याने पूजा यादवच्या स्टेट बँक, ॲक्सिस, फेडरल बँकेच्या बचत खात्यांमधून एकूण दोन लाख २६ हजार ३८ रुपये वेगवेगळ्या ठिकाणांहून ऑनलाईन पध्दतीने काढून स्वताच्या बँक खात्यात वळते केले.

पोलीस बातमी पत्र

मुंबई

२

मुंबई, मंगळवार ०६ ते १२ सप्टेंबर - २०२२


# द्राक्षावरील रोग व कीड नियंत्रण

**महाराष्ट्रामध्ये द्राक्ष पिकाची लागवड दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्याचप्रमाणे द्राक्षावर येणाऱ्या रोगांच्या प्रमाणातही वरचेवर वाढ होत आहे. त्यामुळे द्राक्ष उत्पादनावर रोग व किडींचा मोठा परिणाम होतो. त्यामुळे द्राक्ष पिकावर येणारे प्रमुख रोग आणि त्यांचे नियंत्रण कसे करावे, यासंबंधीची माहिती घेणे शेतकऱ्यांसाठी गरजेचे आहे.**

**बुरशीजन्य रोग -** द्राक्ष पिकावर प्रामुख्याने आढळणारे रोग पुढीलप्रमाणे:- १) भुरी २) केवडा ३) करपा ४) फोमॉपसिस करपा ५) डिप्लोटिया काडीमर व घडकूज ६) तांबेरा ७) इतर फळ व घडकूज.

**प्राथमिक बुरशीमुळे होणारी कूज-**
१) बोट्रायटीस कूज .
२) अल्टरनेरिया कूज.
३) क्लॅडोस्पोरिम कूज.

**दुय्यम बुरशीमुळे होणारी कूज-**
१) ॲस्परजिलस कूज
२) रायझोपस कूज
३) निळी कूज.



**१) भुरी -**

**लक्षणे -**ही बुरशी वेलीच्या सर्व हिरव्या भागावर वाढू शकते. बुरशीची वाढ पानाच्या वरील बाजूस जास्त प्रमाणात दिसते. काही वेळा रोगट पानाचा वरील भाग तेलकट पिवळसर दिसतो. पानांची वाढ खुंटते व त्याच्या कडा वरच्या बाजूस वाळू लागतात. फुटीचे शेंडे, तणावर यांच्यावर पांढरट बुरशीची वाढ होऊन त्याची वाढ खुंटते. पानाच्या आणि घडाच्या देठावरील हा रोग येतो. घड फळावर असताना रोग आल्यास फळधारणा नीट होत नाही. त्यामुळे फळावर बुरशी वाढत राहते व पक्व होणारी फळे फटू लागतात. फळातील साखरेचे प्रमाण ८ टक्क्यांपेक्षा पुढे गेल्यावर फळांवर भुरी रोग येत नाही.

**जीवनक्रम -** ही बुरशी प्रतिकूल परिस्थितीत धाग्याच्या स्वरुपात वेलीच्या सुप्त डोळ्यामध्ये जिवंत राहते. हंगाम सुरू होताच सुप्त डोळ्यांमधील धागे वाढून कोवळ्या फुटीवर हल्ला करतात. आणि तेथे पांढऱ्या बुरशीची वाढ झालेली दिसते.

**अनुकूल हवामान -**तापमान २० अंश से. ते २४ अंश से. असताना रोगाचा प्रसार झपाट्याने होतो. तापमान ३५ अंश से.च्या पुढे गेल्यास बीजे रूजू शकत नाहीत. त्यामुळे रोगास आळा बसतो. तापमान ४० अंश से. पुढे गेल्यास बुरशीचा नाश होतो.

**उपाय -** बागेतील स्वच्छता महत्त्वाची असल्याने बाग स्वच्छ ठेवावी. दोन्ही छाटणीनंतर रोगट काड्या, पालापाचोळा जमा करून त्यांचा नायनाट करावा.

भरपूर खेळती हवा आणि सूर्यप्रकाश राहील त्याठिकाणी बागेची लागवड करावी. फुटी मर्यादित ठेवाव्यात. बुरशीनाशकाचा वापर २०० लीटर पाण्यासाठी खालील बुरशीनाशक आलटून पालटून वापरावीत.

अ) पाण्यात विरघळणाऱ्या गंधकाची फवारणी करावी. ब) बेलेटोन २५ टक्के - १०० ग्रॅम. क) कॉन्टाफ (हेप्झॅकॉमझोल) - १०० मि. लि. ड) कॅरेथेन (डिनोकॅप) ३० ते ७० मि.ली. इ) कॅलिक्झीन - १०० मि.ली. चा वापर करावा.

# हिरव्या मिरचीची लागवड

**सध्या पावसाळ्याचे दिवस सुरु आहेत. शेतकऱ्यांचा पहिला शेतीचा हंगाम म्हणजे खरीप हंगाम होय. या हंगामामध्ये भाजीपाला लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. या हंगामात पारंपरिक शेती न करता आधुनिक शेती करून अनेक शेतकरी लाखोंची कमाई करत आहेत. या हंगामात हिरव्या मिरचीची लागवड फायदेशीर ठरू शकते.**



भारतामध्ये हिरव्या मिरचीला खरीप हंगामातील प्रमुख भाजीपाला पीक म्हटले जाते. ते वाळवले जाते आणि मसाला म्हणूनदेखील वापरले जाते. हिरवी मिरचीची लागवड वर्षातून अनेकवेळा केली जात असली तरी पावसाळ्यात लागवड केल्यास भरघोस उत्पादन मिळण्यास मदत होते. यादरम्यान मिरचीच्या पेरणीपासून ते काढणीपर्यंतची सर्व कामे काळजीपूर्वक करावी लागतात. विशेषत: मिरची पेरणीसाठी प्रगत जातीची निवड करावी, जेणेकरून पिकाला धोका होण्याची शक्यता कमी असते.

**अशाप्रकारे मिरचीची लागवड करा**

मध्यम पाऊस असलेल्या ठिकाणी मिरची पिकाची लागवड करता येते. जास्त पाऊस आणि अति उष्णतेमुळेही पिकाचे नुकसान होऊ शकते, हे लक्षात ठेवा. त्यामुळे ज्याठिकाणी पाणी साचणार नाही, अशा ठिकाणी मिरची पिकाची लागवड करावी. त्याच्या लागवडीसाठी, वालुकामय किंवा चिकणमाती जमिनीत पाण्याचा निचरा करा आणि सेंद्रिय पद्धतीने शेत तयार करावे. चांगल्या उत्पादनासाठी, शेतात कंपोस्ट खत घालणे आवश्यक आहे, जेणेकरून सेंद्रिय पदार्थ जमिनीत पुन्हा भरता येतील आणि स्वतंत्र खतांचा वापर करावा लागणार नाही.

सेंद्रिय खतांमुळे जमिनीची सुपीकता वाढते. तसेच फळेही अधिक लागतात. जर तुम्ही सेंद्रिय पद्धतीने मिरचीची लागवड केली तर तुम्हाला कमी कष्टात जास्त मिरची मिळू शकते. त्यामुळे बराच वेळ, श्रम आणि पैसा वाचतो. मिरचीच्या लागवडीसाठी त्याच्या सुधारित बियांपासून झाडे तयार करावीत. त्यासाठी रोपवाटिकेत बायोमासच्या साहाय्याने बियाणे पेरावे. तसेच कृषी सल्लागाराच्या मदतीने प्रगत जातीची निवड करावी. रोपवाटिकेत पेरणी केल्यानंतर ४ ते ८ आठवड्यांत मिरचीची रोपे तयार होतात, लावणीपूर्वी मायकोरिझा ५ मि.ली. मिरचीच्या झाडांची मुळे एक लीटर पाण्यात विरघळवून प्रक्रिया करावी. लावणीच्यावेळी शेतातील जमिनीत हलका ओलावा करून झाडे ओळीने लावावीत, म्हणजे तण काढणे सोपे जाते. मिरची लागवड करण्यासाठी कमी सूर्यप्रकाश आणि संध्याकाळची वेळ केव्हाही चांगली असते. लागवडीपूर्वी जमिनीची पूर्णपणे मशागत करून घ्यावी. तसेच शेतात मिरचीसाठी लागणारी सर्व खते शेतात टाकावी. हिरवी मिरची पिकापासून अधिक उत्पादन मिळविण्यासाठी आणि जमिनीतील पोषकतत्त्वांची कमतरता पूर्ण करण्यात सेंद्रिय खते महत्त्वाची भूमिका बजावतात. अशास्थितीत शेत तयार करताना एकरी ५० क्विंटल गांडूळ खत किंवा ८० ते १०० क्विंटल शेणखत शेतात टाकवे. यासोबतच माती परीक्षणाच्या आधारे योग्य प्रमाणात नत्र, स्फूरद व पालाश यांचाही वापर शेतात करावा. असे व्यवस्थापण केल्यास अपेक्षित उत्पादन मिळते.



# दुधाळ गाईचे संगोपन व व्यवस्थापन



**खाद्य व्यवस्थापन -** ज्याठिकाणी भरपूर प्रमाणात हिरवा चारा उपलब्ध आहे, अशा हिरव्या कुरणात गाभण जनावरांना चरण्यासाठी सोडण्याची सोय असल्यास ते निश्चितच फायद्याचे ठरते. त्यामुळे गाभण जनावरांना ताजी वैरण खायला मिळते. बरोबरच मोकळ्या जागेत फिरायला मिळत असल्याने मोकळी हवा, सूर्यप्रकाश आणि आवश्यक तो शारीरिक व्यायाम होतो. हिरव्या चाऱ्याची सोय नसेल तर जनावरांना गोठ्यातच भरपूर प्रमाणात हिरवा चारा खाण्यास देता येईल, अशी व्यवस्था करावी.

शेवटच्या दोन महिन्यांत गर्भाची वाढ झपाट्याने होते, त्यामुळे या काळात चाऱ्यात वाढ करावी. कारण गर्भावस्थेच्या अंतिम काळात गाभण जनावराला स्वत:च्या पोषणाकरिता किमान एक ते दिड किलो पशुखाद्य द्याव गर्भाच्या वाढीसाठी आणखी एक ते दीड किलो जास्तीचे पशुखाद्य देण्याची गरज असते. अशावेळी जास्त खाद्य दिल्याने गर्भाची वाढ चांगल्या प्रकारे होते.

**भाकड काळाचे नियोजन-** रेतन केलेल्या तारखेची नोंद महत्त्वाची असते. कारण त्या नोंदीनुसार तिचे दूध काढणे बंद करावे. प्रसूतीच्या अडीच ते तीन महिने अगोदर दूध काढणे बंद करावे. दूध काढणे बंद केल्यामुळे दुग्ध उत्पादनासाठी लागणारे अन्नघटक गायीची झालेली शारीरिक झीज भरून काढण्यासाठी व गर्भातील वासराच्या वाढीसाठी उपयोगात आणले जाते.

पुढील वेतातील दुधासाठी कासेची वाढसुध्दा चांगल्याप्रकारे होईल व विण्यापूर्वी गायीचे व गर्भातील वासराचे आरोग्य चांगले राहील. विण्यापूर्वी प्रत्येक गाय अडीच ते तीन महिने भाकड असावी.

देशी गायीच्या दोन वेतात दीड ते दोन वर्षे अंतर राहाते. त्या जेमतेम ६ ते ७ महिनेच दूध देतात म्हणजेच विण्यापूर्वी १२ ते १७ महिने ही भाकड राहतात. मात्र संकरित गायी आणि त्यामध्ये पहिल्या वेतातील गायी वेत संपत आले तरी बरेच दूध देतात. अशा गायी आटवणे खूप आवश्यक असते. गाय जर जास्त दुधाळ असेल तर याहून अधिक काळ म्हणजे तीन महिन्यांपर्यंत भाकड ठेवणे गरजेचे असते. गाय ३ ते ४ लीटर दूध देत असेल, तर धार काढणे एकदम बंद करावे. याहून जास्त दूध देणाऱ्या गायीचा खुराक बंद करावा.

धार दिवसातून दोनदा काढत असल्यास ती एकदा आणि एकदा काढत असल्यास ती दोन-तीन दिवसांआड काढावी. दूध कमी झाल्यावर एकदम धार थांबवावी. यामुळेही दूध कमी न झाल्यास गायीची हिरवी वैरण बंद करावी. आणि त्यानेही न झाल्यास एक दिवस पाणी कमी पाजावे हे उपाय योजण्यापूर्वी गायीला दुभत्या जनावरांपासून बाजूला काढून भाकड जनावरांमध्ये बांधावे. अशारितीने गाय आटल्यानंतर ती दोन-तीन दिवसांत कास कमी करते, त्यानंतर तिच्या प्रत्येक सडात पशुतज्ज्ञांच्या सल्ल्याने प्रतिजैविक सोडावे. यामुळे भाकड काळात गायीला काससुजीचा धोका होणार नाही. गाय पूर्णत: भाकड (आटल्यानंतर) झाल्यानंतर गरजेनुसार आहार परत सुरू करणे हे देखील अतिशय महत्त्वाचे असते.

**(उत्तरार्ध)**

वसई विरार शहर महानगरपालिका

जा.क्र : वविशम/प्रससी/जाहि. ५२/२०२२ दि. ३०/०८/२०२२

वसई विरार शहर महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अधिसुचीतल प्रकरण 8 मधील कलम 1(1) व 1(2) अन्वये व 469 च्या नुसार जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरणासंबधित वसई विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय विरार येथे प्राप्त मालमत्ता प्रकरणपरत्वे नोटीसनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत हितसंबधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी हस्तांतरण करुन महानगरपालिका याबाबत नोंद घेतली जाईल.

| अ.क्र | दिनांक | अनुसुचित दोन/तीन मधील नोटीसाचा मालमत्ता क्र. | करनिर्धार पुस्तकातील वार्ड क्र. | मालमत्तेचे ठिकाण | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणा-याचे नाव किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव | खरेदीखताचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०१.०६.२०२२ | CH04/1514/34 | ०४ | एच डी आय एल इंडस्ट्रीयल पार्क बि. नं. 8, दुकान नं. /117 | देवांग सुखदेव जोशी | स्टेफी रॉयल फरगोज |
| २ | ०१.०६.२०२२ | CH07/425/23 | ०७ | साई दर्शन चाळ, रुम नं. सी/01, आर टी.ओ समोर | जय देव मित्र | मंगल भरत पाटील |
| ३ | ०२.०६.२०२२ | CH03/57/6 | ०३ | साई धाम अपार्टमेंट रुम नं. /06 कोपरी | नवनाथ शांताराम वाडकर | मोहिनी महेंद्र कुंभार |
| ४ | ०२.०६.२०२२ | KS01/65 | ०१ | फणसपाडा | गजानन आंदु पाटील | संतोष गजानन पाटील |
| ५ | ०२.०६.२०२२ | CH01/148/15 | ०१ | कुलस्वामिनी नगर रुम नं. सी/107 महालक्ष्मी कंस्ट्रक्शन | सुशिल बी कदम | संतोष कृष्णा बाटले |
| ६ | ०२.०६.२०२२ | CH01/202/23 | ०१ | टिटवाळा दर्शन अपार्टमेंट रुम नं. 203, गासकोपरी | गणेश भागोजी खांडेकर | प्रमोद बंडु गुरव |
| ७ | ०२.०६.२०२२ | CH04/1514/97 | ०४ | एच डी आय एल इंडस्ट्रीयल पार्क बि. नं. 10 दुकान नं. /104 | राम एस सितलानी व राशी हरिश्चंद्रानी | राशी हितेश हरचंदानी |
| ८ | ०२.०६.२०२२ | CH01/187/5 | ०१ | श्री दत्तसाई अपार्टमेंट रुम 05, गासकोपरी, चंदनसार रोड | लिलावती सुरेश पाटील | कुसमावती पद्मानाथ बंगेरा |
| ९ | ०३.०६.२०२२ | CH04/1164/7 | ०४ | जय साई चाळ, गासकोपरी चंदनसार | विश्वनाथ चंद्रकांत जागडे | अमिर मोहन जाधव |
| १० | ०३.०६.२०२२ | CH07/458/92 | ०७ | गोवरीनगर चाळ नं. झेड, रुम नं. 3 | राजू जेठींगराव गवारे | सुनिता राजु गवारे |
| ११ | ०६.०६.२०२२ | CH05/159/6 | ०५ | साईहिलच्या मागे चंदनसार | शशिकांत फुलचंद मौर्या व संदिप फुलचंद मौर्या | हंसराज बी निषाद व धर्मेंद्र बी निषाद |
| १२ | ०६.०६.२०२२ | CH01/130/20 | ०१ | साई समर्थ नगर चाळ गास कोपरी | ज्योती प्रकाश खापरे | यशवंत विठ्ठल रांबाडे |
| १३ | ०६.०६.२०२२ | CH04/1102/9 | ०४ | चंदनसार | बसप्पा बालप्पा इडगर | तुकाराम रामराव चव्हाण |
| १४ | ०६.०६.२०२२ | CH01/161/26 | ०१ | जिवदानी कृपा चाळ रुम नं. 18 गासकोपरी | शितल सुधान्शु लाल | शीतल एस. सिंह |
| १५ | ०६.०६.२०२२ | CH01/161/28 | ०१ | जिवदानी कृपा चाळ रुम नं. 20 गासकोपरी | शितल सुधान्शु लाल | शीतल एस. सिंह |
| १६ | ०६.०६.२०२२ | CH04/1538/4 | ०४ | अंगणवाडी जवळ कातकरीपाडा, चंदनसार रोड | रामानंद जगदेव सिंह | कमलेश जनार्दन मंडल |
| १७ | ०७.०६.२०२२ | SH01/774/40 | ०१ | साई श्रध्दा चाळ राईपाडा शिरगांव | राधेश्याम झा | रंजीत उदयकांत झा |
| १८ | ०७.०६.२०२२ | CH07/412/35 | ०७ | श्री गणेश चाळ रुम नं. सी/15 गणेश मंदिरामागे भाटपाडा | ज्योती शांताराम शिंदे व सोनाली शांताराम शिंदे | केसरीप्रसाद लुदुर शर्मा |
| १९ | ०७.०६.२०२२ | CH03/64/69 | ०३ | जिवदानी पार्क 2 रुम नं. /108 गासकोपरी, काटई | अविनाश प्रविण पेंढारी | किर्ती किरण खोपटकर |
| २० | ०७.०६.२०२२ | CH03/47/1 | ०३ | सुशिला अपार्टमेंट रुम नं. /001 काटई | शशिकांत शितलाप्रसाद दुबे | सोनु प्रभुनाथ राजभर |

(गणेश पाटील)
प्र. सहा. आयुक्त
प्रभाग समिती "सी" चंदनसार
वसई विरार शहर महानगरपालिका

## चिपळूणातील एटीएम मशीन

पोलीस पथकास सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष ३ विरार मधील कार्यरत अधिकारी व अंमलदारांची वेगवेगळी स्वतंत्र पथके तयार करुन गुन्हयातील आरोपींचा तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने माहिती प्राप्त करुन शोध घेतला व आरोपी १) विशाल धर्मा राय, वय १९ वर्षे, रा. जैन नगर, खेडा फिरोजाबाद, राज्य उत्तर प्रदेश., २) संजु वालीया राय, वय २७ वर्षे, रा. घर नंबर ३५४, सुशीला विहार २ , बुलंद शहर, राज्य उत्तर प्रदेश, ३) शिवराम हिरालाल माली, वय ५७ वर्षे, रा. , जैन नगर, खेडा फिरोजाबाद, राज्य उत्तर प्रदेश, ४) मिना रामलाल सोलंकी, वय ४५ वर्षे, रा. गुप्ता मेडीकल जवळ, जैन नगर, खेडा फिरोजाबाद, राज्य उत्तर प्रदेश यांना अंदाजे ५ किलो वजनाच्या पिवळया रंगाचे बनावट सोन्याचे पाने, मनी व मन्यांची माळ अशा मुद्देमालासह पोलिसांनी ताब्यात घेतले असून सदर गुन्हयाचा पुढील तपास वालीव पोलीस ठाणे करीत आहे. सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), अति.कार्यभार (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.प्रमोद बडाख, पो.उप.निरी. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, सागर बारवकर, पो.ना. मनोज सकपाळ, पो.अं.राकेश पवार, अश्विन पाटील, सुमित जाधव सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष ३ विरार यांनी पार पाडली आहे.

## ब्लॅकमेल करून महिला वकिलावर

करून तपास सुरू केला आहे. नागपूर: गेल्या काही दिवसांपासून शहरात अनुसूची एकमध्ये असलेल्या पक्ष्यांसह सापांना जेरबंद करुन त्याचे छायाचित्र सोशल मीडियावर व्हायरल करण्याचे प्रकार झपाट्याने वाढू लागले आहे. याकडे वनविभागाचे दुर्लक्ष असल्याने हा प्रकार बळावला आहे. शुक्रवारी अशीच एक घटना उघडकीस आली आहे. याबाबत सूचना मिळताच वनविभाग ॲक्टिव्ह झाला असून प्रकरणाची सत्यता तपासून कारवाई करणार असल्याचे समजते. सेमिनरी हिल्स येथील ट्रान्झिट ट्रीटमेंट केंद्रात हे जखमी झालेले आणि इतरही कारणामुळे जेरबंद करण्यात आलेल्या वन्यप्राण्यांसह पक्ष्यांच्या उपचारासाठी महत्त्वाचे ठिकाण झालेले आहे. काही उत्साही वन्यप्रेमी वन्यजीवाला वाचविण्यासाठी घटनास्थळी जातात आणि पक्षी, साप, सरपटणाऱ्या प्राण्यांना जेरबंदज करुन वाचवितात. दरम्यान थेट सेंटरला न येता माध्यमांकडे जात त्याचे फोटोसेशन करणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढली असल्याने वनविभाग कारवाई करण्याच्या तयारीत आहे.

## मंगला एक्सप्रेसमध्ये विसरलेला मोबाईल

आसनावरील प्रवाशाने आपल्या समोरील आसनावर एक मोबाईल प्रवासी विसरला आहे अशी माहिती दिली. पोलिसांनी तो मोबाईल ताब्यात घेतला. कल्याण लोहमार्ग पोलिसांना ती माहिती दिली.लोहमार्ग पोलिसांनी कमल कदम यांना कसारा येथे जाण्यास सांगितले. त्या तेथे गेल्यावर तेथील हवालदारांनी त्याची ओळख पटवून नऊ हजार रुपये किमतीचा मोबाईल त्यांना परत केला. याबद्दल कमल यांनी पोलीस पथकाचे कौतुक केले.

## विजेच्या धक्क्याने तरुणाचा

दिली आहे. एक कळ काढण्यात आल्यानंतर दुसरी काढत असताना हा विजेचा धक्का या तरूणाला लागला असावा असा अंदाजही नरवडे यांनी व्यक्त केला आहे. याप्रकरणी विद्युत निरिक्षकांना अहवाल देण्यात आला असून त्यावर पुढील प्रक्रिया केली जाईल, अशी माहिती नरवडे यांनी दिली. या रोहित्राला संरक्षण लोखंडी जाळी होती. ती उघडून हा तरूण रोहित्राजवळ गेला असावा, असाही अंदाज स्थानिक महावितरणाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

## डोंबिवलीत गणपती विसर्जन

यावेळी रस्ते सुस्थितीत असावेत म्हणून डोंबिवली बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे यांनी डोंबिवली विभागातील खड्डे भरलेल्या सर्व रस्त्यांची पुन्हा पाहणी करुन या रस्त्यांवर सततच्या वाहन वर्दळीमुळे खड्डे पडले असतील ते बुजविण्यास सुरुवात केली आहे. डोंबिवली पूर्वेतील गोग्रासवाडी, पाथर्ली, संत नामदेव पथ भागात आता खड्डे भरणीची कामे करण्यात येत आहेत. मनसेचे शहराध्यक्ष मनोज घरत यांनी बांधकाम विभागाकडे या भागातील खड्डे भरणीची कामे प्राधान्याने करण्याची मागणी केली होती. गणपती विसर्जनानंतर सोमवार पासून डोंबिवलीतील सर्वाधिक वर्दळीच्या पण खराब झालेल्या रस्त्यांवर डांबरीकरणाचे काम करण्यात येणार आहे. यासाठी वाहतूक विभागाचे सहकार्य घेऊन हे रस्ते बंद ठेऊन मग डांबरीकरणाची कामे केली जाणार आहेत, असे कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे यांनी सांगितले.कल्याण पूर्वेतील चेतना विद्यालय ते मलंग रस्त्यावरील खड्डे भरणीची कामे ‘एमएमआरडीए’कडून करण्यात येत आहेत. शासन आदेशाप्रमाणे पालिका हद्दीतील महत्वाच्या रस्त्यांची खड्डे भरणीची कामे ‘एमएमआरडीए’कडून केली जात आहेत. यामध्ये नांदिवली स्वामी समर्थ मठ रस्ता, मानपाडा ते विद्यानिकेतन शाळा रस्ता या रस्त्यांचा समावेश आहे, असे पालिका अधिकाऱ्याने सांगितले. हवामान विभागाने पुन्हा पावसाचा अंदाज सांगितला आहे. या अंदाजाप्रमाणे रस्ते सुस्थिती आणि डांबरीकरणाची कामे हाती घेतली जाणार आहेत, असे लोकरे यांनी सांगितले.मागील महिनाभरात डोंबिवली बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता लोकरे यांनी दिवस, रात्र खड्डे भरणीची यंत्रणा कामाला लावून गणेशोत्सवापूर्वी खड्डे भरणीची कामे पूर्ण करून घेतली. या रस्त्यांवर पुन्हा काही ठिकाणी सततच्या वाहनांच्या वर्दळीमुळे खड्डे दिसू लागल्याने असे खड्डे भरणीची कामे पुन्हा हाती घेण्यात आली आहेत.

## संजय राऊतांना दिलासा नाहीच

तरी संजय राऊत हे कोठडीत आहेत. ईडीने ताब्यात घेतल्यानंतर शिवसेना खासदार संजय राऊत यांना 8 ऑगस्ट रोजी न्यायालयीन कोठडीत पाठण्यात आलं होतं. त्यानंतर पीएमएलए कोर्टाने संजय राऊतांची न्यायालयीन कोठडी पाच सप्टेंबरपर्यंत वाढवली होती. या कोठडीत वाढ केली जावी, अशी मागणी ईडीने केली होती. ईडीने केलेल्या मागणीनुसार संजय राऊतांची कोठडी आणखी 14 दिवसांनी वाढवण्यात आलीय. मुंबईच्या गोरेगाव येथील पत्रा चाळीच्या आर्थिक व्यवहारात गैरप्रकार झाल्याच्या आरोपाखाली संजय राऊत यांना अटक करण्यात आली आहे. आता पुन्हा एकदा त्यांच्या न्यायालयीन कोठडीत वाढ करण्यात आल्यानं संजय राऊतांच्या अडचणी वाढल्या आहेत. आपल्यावर करण्यात आलेले आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाचे सर्व आरोप संजय राऊत यांनी फेटाळून लावले होते. संजय राऊत हे माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे निकटवर्तीय मानले जातात. संजय राऊत यांच्यावर सहआरोपी प्रवीण राऊत यांच्यासोबत कांदिवलीतील पत्रा चाळ पुनर्विकास योजने पैसे लाटल्याचा आरोप करण्यात आला आहे. याच आरोपाखाली त्यांना ईडीने चौकशीसाठी ताब्यात घेतलं होतं. त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली होती.

## चर्चमध्ये तीन मुलींवर

दाखल करण्यात आला होता. महिला व बाल विकास मंडळाच्या अधिकाऱ्यांनी सर्व मुलांचे काउन्सलिंग केल्यावर आणखी तीन मुलींनी आपल्यावर लैंगिक अत्याचार झाल्याची कबुली दिली आहे. त्यामुळे या संदर्भात महिला व बालविकास विभागाचे जिल्हा बाल सौरक्षक अधिकारी रामकृष्ण रेड्डी यांनी एनआरआय पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. एनआरआय पोलिसांनी या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत पास्टर येसुदासन याच्यावर पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, घटनेने एकच खळबळ उडाली असून पालकांमधून आश्रमाविरोधात संताप व्यक्त केला जात आहे. हा प्रकार अत्यंत गंभीर असून याची सखोल चौकशी करण्यात यावी आणि दोषींवर कठोरातील कठोर कारवाई करावी अशी मागणी नागरिक आणि पालकांमधून होत आहे.

## संपादकीय...



# करिअर की जीवनशैली?

'करिअर की लग्न?' म्हणजेच पर्यायानं 'करिअर की कुटुंब?' हा आजच्या तरुणाईपुढचा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. हा प्रश्न अर्थातच तरुण-तरुणी दोघांनाही आहे, पण मागील एका लेखात आपण हे पाहिलं की आजच्या बहुतांश तरुणींना 'मातृत्वा'ची ओढ आहे. करिअर आणि मातृत्व यात समतोल कसा साधता येईल, या विषयी त्या काहीशा संभ्रमात असल्या तरी त्या मातृत्व नाकारीत नाहीत. साहजिकच त्यांना 'लग्न' हवं आहे, 'कुटुंब' हवं आहे. 'फक्त करिअरसाठी लग्न नको', हा निर्णय त्यांना एकांगी वाटतो.

आजच्या तरुणांचं मात्र करिअरला प्राधान्य आहे. जागतिकीकरण, नवनव्या संधी, बदलतं राहणीमान, वाढती स्पर्धा... अशा अनेक घटकांमुळे त्यांच्यासाठी सर्वांत महत्त्वाची 'करिअर'च आहे. साहजिकच त्यांना भरपूर यश मिळवायचं आहे, 'मजबूत' पैसा कमवायचा आहे - तोही शक्य तितक्या कमीत कमी वेळात. त्यातूनच आज 'वर्कोहोलिक' तरुणांची संख्या वाढते आहे. अशा असंख्य तरुणांशी संवाद साधणाऱ्या, त्यांना समुपदेशन करणाऱ्या ज्येष्ठ मानसतज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांचं या संदर्भातील निरीक्षण नक्कीच महत्त्वाचं आहे आणि तितकंच अस्वस्थ करणारंही! ते म्हणतात, 'ही 'करिअरिस्ट' मंडळी प्रचंड महत्त्वाकांक्षी असतात, साहजिकच वर्कोहोलिकही.

सतत कामाचा विचार, करिअरची चिंता आणि अर्थातच न पेलणारा स्ट्रेस! यशामुळे त्यांना प्रतिष्ठा मिळत असते, पैशामुळे सुखसोयी मिळत असतात... पण तरीही 'आनंद' दूरच राहतो. त्यामुळेच त्यांना 'आपण हे सगळं का करतोय' असाही प्रश्न पडत असतो. अनेकदा जे कमावण्याचा अट्टहास आपण करतोय ते सारंच व्यर्थ आहे, असंही जाणवत असतं. पण हे मान्य न करता ही मंडळी पळवाटा शोधतात. त्यांना 'ईझी प्लेअर्स' म्हणता येईल. हे 'ईझी प्लेअर्स' सगळ्या सोप्या, इन्स्टंट गोष्टींच्या मागे लागतात. लग्न, कमिटमेंट हे त्यांना नकोसं असतं. त्यापेक्षा धडाधड अफेअर्स, ब्रेक-अप, फ्लर्टिंग, तासन्‌तास चॅटिंग, ड्रिंक्स, महागडं शॉपिंग असे तात्पुरते 'रिलॅक्स' होण्याचे मार्ग अवलंबिले जातात. आतून मात्र त्यांना अस्वस्थ, असुरक्षितच वाटत असतं. एकटेपण जाणवत असतं. ना आंतरिक संवाद... ना काही अर्थपूर्ण संबंध! इतकं यश मिळवूनही पदरी काय पडलं, हा प्रश्न त्यांना सतावीत राहतो.'

यंत्रयुगात माणूस यंत्रासारखंच काम करत होता. आता संगणक युगात तो संगणकासारखं काम करतोय... अथक. पण म्हणून त्यानं आयुष्यातला जिव्हाळा हरवून बसता कामा नये. हा जिव्हाळा देणारी नातीगोती जपायला हवीत. आपलं कुटुंब, मित्र यांचं आपल्या जीवनात काही खास स्थान असतं. ते तसंच राहायला हवं. त्यांच्याशी सतत शेअरिंग व्हायला हवं. 'ग्लॅमरस' क्षेत्रात झगमगतं यश मिळवणारे अनेक 'सेलेब्रिटिज'ही हे आवर्जून सांगत असतात, 'आयुष्यातला सर्वांत आनंदाचा काळ हा कुटुंबियांसमवेत मजेत घालवलेला असतो. बाहेरचे सगळे ताणतणाव त्यामुळेच विरून जातात.'

अवघ्या चाळीसाव्या वर्षी 'भारतरत्न' हा सर्वोच्च बहुमान प्राप्त केलेला सचिन तेंडुलकर म्हणतो, 'केवळ शतकं करणं, सामने जिंकणं किंवा भरपूर पैसे कमावणं यातच सगळं सुख आहे असं मला नक्कीच वाटत नाही. हे सगळं साजरं करायला आपली जवळची माणसं सोबत असणं, यातच खरा आनंद सामावलेला असतो. तरुणांना मी एवढंच सांगेन, भरपूर यश मिळवा, तुमची स्वप्नं साकार करा, पण ती करत असताना तुमच्यासाठी कुणीतरी त्याग करत असतं, तुम्हांला मनापासून साथ देत असतं, याचा विसर पडू देऊ नका! स्वतःच्या जीवनाची यशस्वी वाटचाल करताना आजूबाजूचे आनंदी कसे राहतील याचाही विचार करा. कारण त्यातून मिळणारा आनंद आणि समाधान हेच खरं दीर्घकाळ टिकत असतं.' पैसा तर हवाच असतो, पण पुस्तकं वाचणं, संगीत ऐकणं, पावसात भिजणं, गप्पा ठोकणं, मुलांशी दंगामस्ती करणं... हे छोटे छोटे आनंदच आपली जीवनशैली समृद्ध करीत असतात. खरा प्रश्न 'करिअर की लग्न' हा नाही, 'करिअर की जीवनशैली' हा आहे! 'स्टॅन्डर्ड ऑफ लिव्हिंग' की 'स्टॅन्डर्ड ऑफ लाइफ' हा आहे.

• • •

# बिछड़े सभी..

आपल्या जगण्याचा भाग असली तरी काही क्षेत्रे दुर्लक्षित राहतात किंवा त्यांची दखल तुच्छतानिदर्शक प्रतिक्रियांतून घेतली जाते. असे एक क्षेत्र म्हणजे 'बॉलीवूड'. सर्वसामान्य भारतीयांची अभिव्यक्ती ही चित्रपटांच्या आधारे होत असते आणि या चित्रपटांतील संगीत हे विविध वयांत त्याच्या भावभावनांचे वाहक राहिलेले असते. एका अर्थी चित्रपट आणि त्यातील गाणी हे त्या त्या काळचे लोकवाङ्मय आणि त्यातील संगीत हे लोकगीत. स्वातंत्र्याच्या उदयकाळात दिलीपकुमारचा 'शहीद', राज कपूरचा काश्मिरी मुलीची तगमग दाखवणारा 'बरसात' आदी चित्रपट गाजले आणि यानंतरच्या दशकात भारतात अजस्रपणे निर्माण झालेल्या कारकुनाच्या जागा व्यापणे हे जगण्याचे ईप्सित होते त्या काळात प्रदीपकुमार वा भारतभूषण हे चेहऱ्यावर माशीसुद्धा बसली नसती अशा तोंडवळ्यांचे इसम नायक ठरले, नंतरच्या स्थिरावलेल्या काळात मनोरंजनात शम्मी कपूर, देव आनंद इत्यादींची चलती होती आणि तीट लावल्यासारखी दुःखदर्शनाची तहान दिलीपकुमार, राज कपूर भागवत होते. पाठोपाठ सुस्थित अशा गुलछबू वातावरणात राजेश खन्ना 'जिंदगी इक सफर है सुहाना..' वगैरे गाऊन गेला आणि आणीबाणी आणि आसपासच्या अशांत काळाने 'अँग्री यंग मॅन' अमिताभ घडवला. उदारीकरणाने आलेल्या समृद्धीत श्रीमंतीचे अभिमानी प्रदर्शन करणाऱ्या काळात 'दिल चाहता है' घडून गेला. आपले चित्रपट प्रायः आपल्या पुरुषप्रधान संस्कृतीप्रमाणे नायकप्रधान राहिले. ही चर्चा आणखी अशीच बरीच पुढे नेता येईल. पण येथे उद्देश तो नाही. 'रॉयटर्स' या आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थेने 'बॉलीवूड'च्या सद्यःस्थितीबाबत प्रसृत केलेला वृत्तलेख हे या विषयास भिडण्याचे कारण. 'रॉयटर्स'नुसार यंदाच्या आठ महिन्यांत बॉलीवूडतर्फे २६ नवे



चित्रपट आले. त्यातील तब्बल २०, म्हणजे ७७ टक्के इतके सपाटून आपटले. निर्मिती खर्चाची किमान ५० टक्केही वसुली जे करू शकत नाहीत, त्या चित्रपटांस 'आपटले' हे विशेषण जोडले जाते. हे आपटलेल्या चित्रपटांचे प्रमाण करोनापूर्वीच्या २०१९ या वर्षापेक्षा यंदा दुप्पट आहे. यंदा हे चित्रपट वगळता अन्य चित्रपटांचा गल्लाही साधारण ४५ टक्क्यांनी आटला. आपल्याकडे चित्रपटांच्या खर्चाची ७५ टक्के इतकी वसुली चित्रपटगृहात जाऊन, पदरमोड करून चित्रपट पाहणाऱ्यांकडून होते. पण अलीकडे चित्रपटगृहात जाण्याचेच प्रमाण घटल्याने या वसुलीतही चांगलीच घट झाली. करोनाकाळ घरोघर 'ओव्हर द टॉप'- म्हणजे ओटीटी-माध्यमांद्वारे चित्रपट पाहणाऱ्यांची संख्या अतोनात वाढली. संचारबंदीच्या काळात असे होणे साहजिक. आज आपल्या १४० कोटी लोकसंख्येतील सुमारे ३५ ते ३६ कोटी नागरिक, म्हणजे २५ टक्के, घरातल्या घरात हा 'ओटीटी'चा आनंद घेतात. करोनापूर्व २०१९ सालात ओटीटीचे प्रमाण जेमतेम १२ टक्के होते. साहजिकच त्या काळात चित्रपटांचा वार्षिक गल्ला २०० कोटी डॉलर्सपर्यंत गेला. ती बॉलीवूडची सर्वोच्च कमाई. करोनाकाळात ती जी घटली ती आता पूर्वपदावर येता येत नाही. त्यासाठी काय करायचे हा बॉलीवूडसमोरील यक्ष प्रश्न. आमिर खान आणि अक्षयकुमार यांच्या दोन चित्रपटांच्या दणदणीत अपयशाने तो अधिकच गंभीर होताना दिसतो. आमिरच्या 'लालसिंग चड्डा'ने जेमतेम ५६ कोटी रु. कमावले. ही रक्कम त्याच्या खर्चाच्या २५ टक्के इतकीही नाही. अक्षयकुमारचा भगिनीप्रेमाने ओतप्रोत भरलेला 'रक्षाबंधन'ही गाळात गेला. भाऊबहिणींच्या अतूट प्रेमप्रदर्शनाचे मूल्य जेमतेम ३७ कोटी. या चर्चेत ही दोन नावे घेतली कारण ती प्रातिनिधिक आहेत. याचा अर्थ 'राष्ट्रद्रोही' आमिरचा चित्रपट जसा पडला तसाच किंवा अधिक 'राष्ट्रप्रेमी' अक्षयचाही गडगडला. आमिरचा चित्रपट पाडण्याच्या श्रेयावर नवराष्ट्रप्रेमी बहिष्कारवाद्यांनी दावा सांगू नये म्हणून हे मुद्दाम नमूद करावे लागते. या मंडळींची चित्रपट पाडण्याची ताकद खरी असती तर सत्ताधाऱ्यांना राखी बांधणाऱ्या अक्षयचे 'रक्षाबंधन' यशस्वी करता आले असते. पण तसे झालेले नाही. शिवाय परदेशात 'लालसिंग'ची कामगिरी बरी असल्याचे दिसते. म्हणजे या बहिष्कारवाद्यांना परदेशातील देशप्रेमींची अजिबात साथ नसावी. यात लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे याच काळात दक्षिणी चित्रपटांचे न भूतो न भविष्यति असे यश. 'पुष्पा- द राइज' या एकेकाळी सरसकट अंडुगुंडु म्हणून हिणवल्या जाणाऱ्या दक्षिणी चित्रपटाने फक्त देशभरातून सुमारे ३२५ कोटी रुपयांचा गल्ला जमवला. 'ब्रँड' अभ्यासक संदीप गोयल यांच्या अलीकडील लेखानुसार या चित्रपटाचा 'नायक' अल्लु अर्जुन हा हिंदी चित्रपटातील अक्षयकुमार, शाहरूख, अमिताभ, क्रिकेटपटू विराट कोहली इत्यादी जाहिरात चेहऱ्यांस मागे टाकून नवा 'जाहिरातनायक' होऊ घातला आहे. भाषिक चित्रपटनायक असूनही काही आंतरराष्ट्रीय ब्रँड आपल्या उत्पादन प्रसारासाठी बॉलीवुडी नायकांस बाजूस सारून त्याच्याशी करार करू लागले आहेत. या वास्तवदर्शनानंतरचा प्रश्न म्हणजे : हे असे का होत असावे.

'ओटीटी' आदी नवमाध्यमांस यासाठी दोष दिला जात असला आणि काही प्रमाणात ते रास्तही असले तरी ते आणि तेवढेच कारण या दारुण अवस्थेमागे नाही. अनेक चित्रपट अभ्यासकांच्या मते चित्रपटगृहात जाऊन सहकुटुंब मनोरंजन करून घेणे अधिकाधिक खर्चीक होणे हे यामागील एक कारण आहेच. पण हिंदी चित्रपटांतील दिवसागणिक पातळ होत जाणारा मजकूर (कण्टेण्ट) यास अधिक जबाबदार आहे. इतके दिवस हे नाच-गाणे खपून गेले कारण महत्त्वाच्या विषयास भिडणारे, काहीएक निश्चित भूमिका घेऊन चित्रपट निर्माण करणारे अन्य भाषिक इतक्या जोरकसपणे समोर येत नव्हते. त्यामुळे बॉलीवूडवाल्यांचा पोकळपणा खपून गेला. तंत्रज्ञानाने ही दरी भरून काढल्याने अन्य भाषिक उत्तम चित्रपटांस हल्ली अधिक गर्दी होते. साठ-सत्तरच्या दशकात हिंदी चित्रपटसृष्टीत 'तरक्कीपसंद' विचारधारा घेऊन चित्रपटनिर्मिती होत होती. या मंडळींच्या 'इप्टा' संघटनेशी संबंधित निर्माते, कलाकार आदींनी एकापेक्षा एक उत्तमोत्तम चित्रपट रसिकांसमोर दिले. बलराज सहानी, कैफी आजमी, विमलदा, साहिर लुधियानवी, एके हंगल ते गुलजार व्हाया गिरीश कर्नाड, श्याम बेनेगल ते नसिरुद्दीन शहा यांच्यापर्यंत ही रेषा येते. आणि तेथेच थांबते. आज सर्वच चित्रपट बाजारू निघतात असे नाही. एखादा 'आर्टिकल १५' आजही हिंदीतून समोर येतो. नाही असे नाही. पण एकंदर सद्दी गल्लाभरूंचीच. झाडाभोवती किंवा क्लबात कंबरा लचकवत नाचणारे नायक आणि ओलेत्या नायिका किती काळ पाहणार, हाही प्रश्नच. त्या पार्श्वभूमीवर दक्षिणी चित्रपटांतील मुसमुसती वैचारिकता दर्शकांस अधिक भावत असेल तर ते साहजिकच म्हणायला हवे. म्हणजे एकेकाळी ऋत्विक घटक वा सत्यजित रे यांचा बंगाली चित्रपट सकस कथागुणांच्या मुद्द्यावर ज्याप्रमाणे हिंदीवर मात करीत होता ते काम आज दक्षिणी सिनेमा करताना दिसतो. हे सत्य मान्य केले की अक्षयकुमारच्या "लोकांना काय हवे याचा आम्हास नव्याने विचार करावा लागेल. मी कोणते चित्रपट करत आहे आणि पुढे काय करायला हवे, याच्या आत्मपरीक्षणाची गरज आहे," या उद्गारांचे गांभीर्य लक्षात येते. 'रक्षाबंधन' गाळात गेल्यावर त्यास ही उपरती झाली. हिंदीतील ही बौद्धिक पोकळी दक्षिणी चित्रपट हिरिरीने भरून काढीत असताना या चर्चेत मराठी कोठेही नाही, हे सत्य स्वतंत्रपणे नमूद करण्याची गरज नाही, इतके ते उघड आहे. आशयघन कलाकृतींसाठी ओळखल्या जाणाऱ्या गुरुदत्त यांचा चित्रपटाच्या मोहमयी दुनियेवरील 'कागज के फूल' म्हणजे एक मूर्तिमंत शोकात्म काव्य. त्या चित्रपटात कैफी आजमी 'बिछडे सभा बारी बारी..' अशी एक कालजयी नज्म लिहून गेले. आज बॉलीवूडची अवस्था अशी होऊ लागली आहे.

# मुंबईतील तिहेरी बॉम्बस्फोट प्रकरण, सत्र न्यायालयाने फेटाळला आरोपी विरोधातील पोलिसांचा अर्ज

मुंबई - शहरात 2011 मध्ये झालेल्या तिहेरी बॉम्बस्फोट प्रकरणात इंडियन मुजाहिद्दीनचा संशयित आरोपी एजाज सईद शेखला 2015 मध्ये अटक करण्यात आली होती. त्याच्या संदर्भातील पुरावा असलेली सीडी तपास यंत्रणेला आता मिळत नाही. त्यामुळे ती सीडी मिळेल, त्यावेळेस सादर करण्याची परवानगी देण्यासाठी मुंबई पोलिसांनी सत्र न्यायालयात अर्ज सादर केला होता. मात्र मुंबई पोलिसांनी दाखल केलेला अर्ज मुंबई सत्र न्यायालयाने फेटाळून लावला आहे. ई मेल पाठवल्याच्या आरोपाखाली अटकेत दहशतवादी ई मेल पाठवल्याच्या आरोपाखाली एजाज सईद शेख हा अटकेत आहे. तो इंडियन मुजाहिदीनच्या या संशयित सदस्याविरोधात कथित पुरावे असलेली सीसीटीव्ही फुटेजची सीडी हरवलेली आहे. ती सीडी शोधून काढण्यात वारंवार अपयशी ठरल्याबद्दल पोलीस कर्मचाऱ्यांवर कठोर भूमिका घेत सत्र न्यायालयाने हा अर्ज फेटाळला आहे. जेव्हा ते सापडेल तेव्हा त्यांना पुरावे सादर करण्याची परवानगी द्यावी, अशी पोलिसांनी




मागणी केली होती. हे विधान आपल्या आदेशाचे उल्लंघन असल्याचे न्यायालयाने Mumbai Session Court म्हटले आहे. जेव्हा अत्यंत शेवटच्या संधीद्वारे विशिष्ट वेळ देण्यात आली तेव्हा त्याचे पालन करणे प्रभारी पोलीस निरीक्षकांचे कर्तव्य होते, असे ही न्यायालयाने म्हटले आहे. सीडी शोधण्यासाठी अधिकाऱ्याने सर्वतोपरी प्रयत्न केले, पण त्याचा शोध लागला नाही, असे तक्रारदारांनी सांगितले. त्याचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे निवेदनात म्हटले आहे.बॉम्बस्फोटामध्ये 26 जणांचा मृत्यू तर 130 जण झाले होते जखमी 2011 मध्ये 19 सप्टेंबर 2010 रोजी दिल्लीतील जामा मशिदीबाहेर झालेल्या गोळीबार आणि स्फोटाची जबाबदारी स्वीकारणारा एक दहशतवादी ईमेल आयएमने पाठवला होता. मुंबईतील ओपेरा हाऊस झवेरी बाजार आणि दादर कबूतरखाना येथे झालेल्या बॉम्बस्फोटामध्ये जणांचा मृत्यू तर 130 जण जखमी झाले होते. 2011 च्या मुंबई तिहेरी बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी दहशतवादी एजाज सईद शेख, समीर, समर, इब्राहिम, वसीम आणि अजय यासह आरोपी आहेत. यांच्या विरोधात दहशतवादी कारवाया कायद्यांतर्गत तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा आणि आयपीसी अंतर्गत गुन्हेही आरोपीच्या वकिलाने घेतला आक्षेप पोलिसांच्या याचिकेवर आक्षेप घेत शेखचे वकील हसनैन काझी म्हणाले, की सीडीच्या अनुपस्थितीत तो आपला बचाव तयार करू शकला नाही आणि हे त्याच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन आहे. जेव्हा ते शोधून काढले जाईल तसे ते रेकॉर्डवर सादर केले जाईल, असे विधान करणे हे आरोपीच्या मुलभूत अधिकाराला बगल देण्याशिवाय दुसरे काही नाही. तक्रारदाराने संपूर्ण आरोपपत्र सादर केले पाहिजे आणि त्याची एक प्रत आरोपीला द्यावी लागेल, असेही काझी यांनी यावेळी सांगितले.न्यायालयाने नोंदवले निरीक्षण काझी यांच्या युक्तिवादात तथ्य असल्याचे न्यायालयाने Mumbai Session Court म्हटले आहे. आरोपींना आरोपपत्रासह दाखल केलेली सर्व कागदपत्रे प्रदान करण्याचे निर्देश देण्यात आले होते. तरीही तक्रारदाराने सर्व निर्देशांचे पालन केले नाही. रेकॉर्डवर सीडी सादर केली गेली नाही आणि त्याची प्रत आरोपींना प्रदान केली गेली नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे. काय आहे प्रकरण मुंबईमध्ये 13 जुलै 2011 रोजी ओपेरा हाऊस झवेरी बाजार आणि दादर येथील बस स्टॉपवर बॉम्बस्फोट झाले होते. त्यात 26 जणांचा मृत्यू तर 130 जण जखमी झाले होते. जानेवारी 2012 मध्ये एटीएसने नकी अहमद, नदीम अख्तर, कंवरनैन पाथरेजा आणि हारून रशीद नाईक या चार जणांना अटक केली होती. तसेच फरार आरोपी यासीन भटकळ हा या तिहेरी बॉम्बस्फोटांचा मुख्य सूत्रधार असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. त्याने दिल्लीहून मुंबईला नकीकडे स्फोटके पाठवली. ती त्याने चोरलेल्या दुचाकीमध्ये ठेवल्याचा आरोप आहे.

# पोलीस आयुक्त कार्यालयातचं महिलेने स्वतःला संपवलं; अखेर पाच लोकांवर गुन्हे दाखल

शेजारच्या सोबत सुरू असलेल्या वादात स्वतःचा नवराच आपली साथ देत नसल्याने आणि बेदम मारहाण करत असल्याने औरंगाबादच्या सविता दीपक काळे नावाच्या महिलेने थेट पोलीस आयुक्त कार्यालयातच स्वतःला पेटवून घेऊन आत्महत्या केल्याची घटना दोन दिवसांपूर्वी समोर आली होती. त्यानंतर आता याप्रकरणी औरंगाबादच्या वाळूज पोलीस ठाण्यात महिलेच्या पतीसह एकूण पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर यात पोलीस कर्मचाऱ्यांचा सुद्धा समावेश आहे. मृत महिला सविता यांचा पती दीपक काळे चालक असून त्याचे एका महिलेसोबत अनैतिक संबंध असल्याचा सविता यांना संशय होता. यातून ती महिला, तिचा पती आणि मुलगा सविता यांच्यासोबत नेहमी भांडत होते. विशेष म्हणजे यात त्यांना सविता यांचा पती साथ देत होता. अनेकदा दीपक काळे हा आपल्या पत्नीला मारहाण सुद्धा करायचा. त्यामुळे याबाबत वाळूज पोलीस ठाण्यात सविता यांनी गुन्हा सुद्धा दाखल केला होता. मात्र पोलीस दुर्लक्ष करता असल्याची सविताचा तक्रार होती. त्यातूनच त्यांनी टोकाचे पाऊल उचलत थेट पोलीस आयुक्तांच्या कार्यालयाच्या




पायऱ्यावर जाऊन स्वतःला पेटवून घेतले. ज्यात त्यांचा मृत्यू झाला.

यांच्यावर गुन्हा दाखल...

याप्रकरणी वाळूज पोलीस ठाण्यात पाच लोकांच्या विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ज्यात मयत महिलेचा पती दीपक मनोहर काळे ( वय 42 वर्ष, धंदाः ड्राइवर, र.मांडवा तालुका-गंगापूर,जिल्हा औरंगाबाद), शेजारी असलेले, अशोक तुकाराम शेळके (वय45 वर्ष, धंदा-शेती), गोकुळ अशोक शेळके (वय- 20 वर्ष, धंदा-शिक्षण, सर्व राहणारः मांडवा तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद) यांच्यासह अशोक शेळके यांच्या पत्नी आणि वाळूज पोलीस ठाण्यातील एका पोलीस कर्मचाऱ्याचा समावेश आहे. तर यापैकी तीन जणांना अटक करण्यात आली आहे.

मारहाणीची घटना सीसीटीव्हीत कैद विशेष म्हणजे सविता यांना मारहाण करतानाचा एक सीसीटीव्ही व्हिडीओ सुद्धा समोर आला आहे. सविता यांच्या भावाने हा व्हिडिओ पोलिसांना दिला आहे. ज्यात सविता यांना खाली पाडून तीन-चार लोकं बेदम मारहाण करत असल्याचे दिसत आहे. तर सततच्या मारहाणीला आणि छळाला कंटाळून सविता यांनी आत्महत्या केली असल्याचा आरोप त्यांच्या माहेरच्या लोकांनी केला आहे.

पोलीस कर्मचाऱ्यावरही गुन्हा दाखल...शेजाऱ्यांसोबत सुरु असलेल्या वादाबाबत सविता यांनी अनकेदा वाळूज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केले. मात्र असे असतांना पोलिसांकडून याची गंभीर दखल घेण्यात आली नाही. अनेकदा मागणी करूनही सविता यांच्या तक्रारीकडे पोलिसांनी दुलर्क्ष केल्याचा आरोप सुद्धा त्यांच्या नातेवाईकांनी केला आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची गंभीर दखल घेतली असून, याप्रकरणी एका पोलीस कर्मचाऱ्याच्या विरोधात सुद्धा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जवाहिराचे दुकानातील दागिने लूटणाऱ्यांना नालासोपारा, गुजरातमधून अटक



सणासुदीच्या काळात दिवसाढवळ्या गर्दीच्या वेळी दादर पश्चिम परिसरातील जवाहिराचे दुकान २४ ऑगस्ट रोजी फोडून सुमारे एक कोटी २४ लाख ६० हजार रुपये किंमतीचे अडीच किलो वजनाचे सोन्याचे दागिने लूटल्याची घटना घडली. शिवाजी पार्क पोलिसांनी सलग दहा दिवस तपास करून एका आरोपीला नालासोपाऱ्यातून, तर एकाला गुजरातमधून अटक केली. दादर पश्चिम परिसरातील आर. के. वैद्य मार्गावरील सोन्याच्या दागिन्यांचे एक दुकान २४ ऑगस्ट रोजी दुपारी २ ते सायंकाळी ५ दरम्यान फोडून चोरी करण्यात आली. दुकानाच्या मागील बाजूची लोखंडी जाळी तोडून चोरांनी दुकानात प्रवेश केला. चोरांनी दुकानातील सुमारे १ कोटी २४ लाख ६० हजार रुपये किमतीचे अंदाजे २ किलो ४९२ ग्रॅम सोन्याचे दागिने चोरले. शिवाजी पार्क पोलीस ठाण्यामध्ये त्याच दिवशी गुन्हा दाखल करण्यात आला.

या गुन्हयाचा शोध घेण्यासाठी वरिष्ठ पोलिसांनी सहा पथके तयार केली. त्यानंतर सलग १० दिवस तांत्रिक तपासाच्या आधारे मुख्य आरोपीला नालासोपारा परिसरातून अटक करण्यात आली. तर गुन्ह्यातील चोरीचा मुद्देमाल घेऊन पळून गेलेल्या आरोपीला गुजरातमधील अहमदाबाद येथून अटक करण्यात आली. या आरोपीकडून गुन्ह्यातील चोरीचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला, अशी माहिती शिवाजी पार्क पोलिसांनी दिली.

## शिवसेनेच्या निर्धारावर फडणवीसांचा टोला
## 'टार्गेट ठेवणं गैर नाही, पण जनतेच्या...'



**मुंबई,** आगामी मुंबई महापालिका निवडणुकीवरून आता शिवसेना आणि भाजपमध्ये कलगीतुरा रंगला आहे. मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी महापालिकेत शिवसेना १५० जागा निवडून आणणार असल्याचा दावा केला होता. आता त्याला राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.

शिवसेनेच्या दाव्यावर टीका करताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बहुमत मिळवणार असल्याचा दावा करण्यात काहीही गैर नाही, पण जनतेच्या मनात काय आहे?, याचंही भान असायला हवं. मुंबई महापालिकेवर भाजपचीच सत्ता येणार असल्याचा दावा करत फडणवीसांनी शिवसेनेला जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे.

गणेशोत्सव सुरू असल्यानं उपमुख्यमंत्री फडणवीसांनी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या निवासस्थानी जाऊन बाप्पांचं दर्शन घेतलं आहे. यावेळी त्यांच्या मुंबई महापालिकांच्या निवडणुकीबद्दल आणि अमित शहांच्या मुंबई दौ-याबाबत चर्चा झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वीच मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली होती. त्यानंतर भाजप आणि मनसेची युती होणार का?, याबद्दलच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. परंतु त्यावर स्पष्टीकरण देताना फडणवीस म्हणाले की, आमच्या भेटींमध्ये राजकीय चर्चा होत नाही, चर्चा केवळ सोशल मीडियावरूनच होत आहे.

## तंबाखूचा बार ठरला मृत्यूला कार, तंबाखू दिली नाही म्हणून कोल्हापुरात एकाचा खून






कोल्हापूर : तंबाखू दिली नाही म्हणून एकाचा निर्घृण खून करण्यात आल्याची घटना घडली आहे. कोल्हापुरातल्या शिवाजी उद्यम नगर परिसरातल्या कोटीतीर्थ तलाव येथे आज सकाळी ही घटना घडली. एकीकडे गणेश विसर्जनाचा उत्साह असताना दुसरीकडे ही धक्कादायक घटना समोर आली. शंकर सखाराम कांबळे, (वय 56 रा. माळापुढे, ता. शाहुवाडी) असे मृताचे नाव आहे. याप्रकरणी दोघांपैकी एका आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले असल्याची माहिती आहे. राजारामपुरी पोलिसांत हा गुन्हा दाखल झाला आहे. आपल्या मुलीकडे राहायला आलेल्या व्यक्तीचा खून - यातील मृत शंकर सखाराम कांबळे हे आपल्या मुलगीकडे राहायला आले होते. आज सकाळी कोटी लतीर्थ तलाव परिसरात फिरायला गेले असता या ठिकाणी संशयित आरोपी ओंकार शेंडगे (वय 28, रा. यादवनगर) आणि अजय सूर्यगंध (वय 27, रा. यादवनगर) यांनी कांबळे यांच्याकडे त्यांनी तंबाखू मागितली. मात्र आपल्याकडे तंबाखू नसल्याचे सांगत ते पुढे निघून गेले. संशयित दोघांनी कांबळे यांना पकडून त्याची अंगझडती घेतली. त्यावेळी त्यांना तंबाखू सापडली. आपल्याशी खोटं का बोलला या रागातून दोघांनी कांबळे यांना बेदम मारहाण केली. शिवाय शेजारील दगड व बांबूने त्यांना मारहाण केली त्यावेळी रक्तबंबाळ अवस्थेत कांबळे रस्त्यालगतच पडले. अतिरक्तस्त्रावामुळे कांबळे यांचा मृत्यू - याप्रकारामध्ये अतिरक्तस्त्रावामुळे कांबळे यांचा मृत्यू झाला. यामधील एका आरोपीला सध्या पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. दुसरा आरोपी फरार आहे. पोलीस त्याचा शोध घेत आहेत. याच परिसरात एका सीसीटीव्हीमध्ये हे दोघेही संशयित कैद झाले आहेत. त्यामुळे पोलीस अधिक तपास करत आहेत.

### आता वाहतूक पोलिसांवरच होणार कारवाई
## खासगी फोनवापरल्यास दंड




**मुंबई,** वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्यास वाहन चालकांना दंड भरावा लागतो. ही कारवाई वाहतूक पोलिसांकडून करण्यात येते. मात्र आता जारी करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार वाहतुकीच्या नियमांचा भंग झाल्यास तुमच्यावर कारवाई करणा-या पोलिसांनाच कारवाईचा सामना करावा लागू शकतो. राज्यातील वाहतूक पोलिसांनी प्रोटोकॉलचा भंग केल्यास त्यांच्याविरोधात कारवाई होऊ शकते. राज्याचे अपर पोलीस महासंचालक कुलवंत के सारंगाल यांनी याबाबत परिपत्रक जारी केले आहे. त्यानुसार वाहनचालकांवर कारवाई करताना पोलिसांनी खासगी वाहन वा त्यांच्या खासगी मोबाईल न वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसे केल्यास वाहतूक पोलिसांवरच दंडात्मक कारवाई केली जाऊ शकते. वाहतूक नियमांचा भंग करणा-या वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई करताना फोटो काढण्यासाठी स्वतःच्या खासगी मोबाईलचा वापर करू नये. जर कोणी खासगी मोबाईलचा वापर केला तर त्यांच्यावर कारवाई होणार.

वाहूतक नियमांचे उल्लंघन करणा-या वाहनचालकांवर कारवाई करताना काही अधिकारी आणि कर्मचारी संबंधितांवर ई-चलान मशिनद्वारे कारवाई न करता आपल्या खासगी मोबाइलवर फोटो काढत असल्याचे दिसून आले आहे. याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे यापुढे वाहतूक पोलिसांनी फक्त चलान मशिनद्वारेच फोटो काढणे सक्तीचे केले आहे.

वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करताना काही वाहतूक पोलीस स्वतःच्या खासगी मोबाईलवर वाहनाचा फोटो वा चित्रीकरण करून काही कालावधी नंतर ई चलान मशिनमध्ये फोटो अपलोड करतात. तसंच गाडीचे संपूर्ण फोटो न टाकता फक्त नंबर प्लेटचे फोटो टाकतात. त्यामुळे गाडी कोणती आहे, ओळखणे अशक्य होते.

### मुंबईत गणेशोत्सव काळात मोठा घातपात घडवण्याचा कट?
## वांद्यातून संशयित दहशतवाद्याला अटक



**मुंबई,** गणेशोत्सवाच्या धामधुमीत मुंबईकरांसाठी एक चिंता वाढवणारी बातमी समोर आली आहे. वांद्यातून एक दहशतवाद्याला अटक करण्यात आली आहे. मुंबईत दहशतवादी हल्ला घडवण्याचा कट असल्याचा संशय सुरक्षा यंत्रणांना आहे. बंगाल दहशतवादी विरोधी पथकाने महाराष्ट्र दहशतवादी विरोधी पथकाच्या मदतीने एका संशयित दहशतवाद्याला बेड्या ठोकल्या आहेत. दोन्ही राज्यांच्या संयुक्त एटीएस पथकाने मुंबईच्या वांद्रे येथून संशियत दहशवाद्याला पकडले आहे.

दहशतवादी विरोधी पथकाने पकडलेला हा संशयित आरोपी एका आंतरराष्ट्रीय दहशतावादी संघटनेच्या संपर्कात असल्याची माहिती मिळाली आहे. सद्दाम हुसैन खान (३४ वर्ष) असे पकडण्यात आलेल्या दहशतवाद्याचे नाव आहे. विशेष म्हणजे गेल्या काही दिवसांपासून मुंबईत पुन्हा २६/११ सारखा दहशतवादी हल्ला करण्याची धमकी देण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर एटीएसने ही मोठी कारवाई केली आहे. मुंबईत संशयित जिहादीला पकडल्यामुळे खळबळ उडाली आहे. पश्चिम बंगाल एटीएसला माहिती मिळाली होती की, एक संशयित जिहादी मुंबईत लपून बसला आहे. या दहशतवाद्याला पकडण्यासाठी बंगालच्या एटीएसने महाराष्ट्र एटीएससोबत समन्वय साधून वांद्यातील निर्मल नगर भागातून एका संशयिताला अटक केली. पश्चिम बंगाल पोलिसांनी बंगालमधून आणखी एका जिहादीला अटक केली आहे. त्याला डायमंड हार्बर येथून अटक करण्यात आली आहे. दोन्ही संशयित जिहादी आहेत.

अटक करण्यात आलेल्या दोन संशयितांवर गंभीर आरोप आहेत. हे आरोपी सातत्याने एका दहशतवादी संघटनेच्या संपर्कात होते. या प्रकरणी बंगाल पोलिसांचा तपास सुरु आहे. याशिवाय बंगालच्या तपास यंत्रणादेखील युद्ध पातळीवर तपास करत आहेत. अटक करण्यात आलेले संशयित आरोपी देशात आणखी कुणाकुणाच्या संपर्कात होते याचा तपास सुरु आहे. या आरोपींचा काही घातपात घडवण्याचा कट होता का? याचा तपास सुरु आहे.

## मुंबई-कोल्हापूर विमानसेवेला मुहूर्त मिळाला



**मुंबई,** मुंबई ते कोल्हापूर विमान सेवा सुरू करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षापासून करण्यात येत होती. आज केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य शिंदे कोल्हापूर दौ-यावर होते. त्यांच्या उपस्थितीत आज कोल्हापूर विमानतळाच्या सर्वांगीण विकासासाठी बैठक घेण्यात आली. यावेळी चंद्रकांत पाटील आणि खासदार धनंजय महाडिकही उपस्थित होते. या बैठकीत मुंबई-कोल्हापूर विमानसेवेवर अखेर शिक्कामोर्तब करण्यात आले असून त्याची तारीखही निश्चित करण्यात आली आहे. चंद्रकांत पाटील यांनी बैठकीतील निर्णयांची माहिती देताना सांगितले की, कोल्हापूर मुंबई विमानसेवा लवकरच सुरू करण्यात येणार आहे. कोल्हापूर ते मुंबई आणि कोल्हापूर ते बंगळूर विमानसेवा सुरु करण्याची मागणी केंद्रीय उड्डाण मंत्री शिंदे यांच्याकडे करण्यात आली होती. त्याचबरोबर कोल्हापुरातून मुंबईला सकाळची स्वा देण्याची मागणी करण्यात आली होती. जेणेकरून एका दिवसांत मुंबईतील काम आटोपून परत कोल्हापूरला येता यावे. कोल्हापूर-मुंबई विमानसेवा सुरु होण्यासाठी स्लॉट मिळणे खूप महत्वाचे होते. अदानी व्यवस्थापनाकडून येत्या ५ ऑक्टोबरपासून सकाळचा स्लॉट उपलब्ध करून देण्याची तयारी दाखवण्यात आली आहे. त्यामुळे नवरात्री उत्सवात कोल्हापुरकरांना विमानसेवेची भेट मिळाली आहे. कोल्हापुरातून सकाळी १० वाजण्याच्या सुमारास विमान कोल्हापूरला जाईल.

## मुंबईजवळ एनसीबीची मोठी कारवाई, तब्बल 210 किलो गांजा जप्त



NCB-मुंबईने 1 सप्टेंबर रोजी खोपोली येथे 4 कोटी रुपयांचा 210 किलो गांजा जप्त केला. एका तस्करासह वाहनही एनसीबीनं जप्त केलेय. जप्त करण्यात आलेल्या उच्च दर्जाच्या गांजाची मोठी खेप मुंबई आणि लगतच्या भागात नेली जात होती. टक करण्यात आलेला व्यक्ती हा मुंबईचा प्राथमिक रहिवासी असून तो गेल्या काही वर्षांपासून मुंबईच्या विविध भागात विशेषतः गोवंडी, मानखुर्द आणि इतर स्थानिक भागात गांजा आणि इतर अमली पदार्थांचा पुरवठा करत होता. एनसीबीने एपी-ओडिशा भागातून मुंबईला आणलेल्या मोठ्या मालाची डिलिव्हरी जप्त करून कारवाईचा काम केले होते. प्रतिबंधित वस्तूंची डिलिव्हरी पुण्याजवळ काही ठिकाणी करायची होती आणि ती मग पुढे गोवंडी, मुंबईला करायची होती. एनसीबीच्या पथकाने तस्करांच्या हालचालींची अधिक तपासणी केली. पुणे-मुंबई महामार्गावरून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या तस्कराचा आणि वाहनाचा योग्य वेळी माग काढण्यात आला.

वाहनांची सखोल झडती घेण्यात आली ज्यामुळे तपकिरी चिकट टेपने सीलबंद केलेल्या 98 पॅकेट्सची ओळख पटली, जे ड्रग्सच्या पॅकेजिंगसाठी एक सामान्य पद्धत आहे जे अनपॅक केल्यावर, एकूण 210 किलो गांजा जप्त करण्यात आला.

## माणुसकीला काळिमा फासणारी घटना! लातूरमध्ये दिव्यांग महिलेवर अत्याचार

माणुसकीला काळिमा फासणारी एक धक्कादायक घटना लातूरमध्ये घडली आहे. एका दिव्यांग महिलेवर अत्याचार करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. याहून धक्कादायक बाब म्हणजे याबाबत तक्रार केल्यानंतर पोलिसांनी संशयित आरोपींवर गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केली आहे.

लातूर जिल्ह्यातील गातेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत दिव्यांग महिलेवर अत्याचार करण्यात आले आहेत. पीडित महिला ही कर्णबधीर आणि मुकबधीर आहे. तिच्या असहाय्यतेच्या फायदा घेत संशयितांने तिच्यावर अत्याचार केले आहेत. या घटनेनंतर पीडित महिला आपल्या नातेवाईकांसह संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यासाठी पोलीस ठाण्यात गेली. परंतु, पोलिसांनी पीडितेची तक्रार घेऊन संशयितांवर गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केली. अखेर नातेवाईक आणि एका सामाजिक संस्थेच्या रेट्यामुळे पोलिसांनी संशयितावर गुन्हा दाखल करून घेतला, अशी माहिती पीडितेच्या नातेवाईकांनी दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लातूर जिल्ह्यातील गातेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात माणुसकीला काळिमा फासणारी ही धक्कादायक घटना घडली आहे.

## भारत-पाक क्रिकेट सामन्यावर लाखोंचा सट्टा घेणारा बुकी पुणे पोलिसांच्या ताब्यात




पुणे : भारत आणि पाकिस्तान क्रिकेट सामन्यावर लाखो रुपयांचा सट्टा लावणाऱ्या नामांकित बुकीला पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने ताब्यात घेतले आहे. बंडगार्डन पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या डी मोरा पबमध्ये हा सट्टा लावण्यात आला होता. तेथून लाखो रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. त्याशिवाय मोबाईल, सट्टा लावण्यासाठी आवश्यक साहित्य ताब्यात घेण्यात आले आहे. श्रीपाद यादव असे ताब्यात घेण्यात आलेला बुकीचे नाव : काल एशिया कप स्पर्धेतील सुपर 4 मध्ये दुसरा सामना भारत विरुद्ध पाकिस्तान सामना झाला. या सामन्याच्या वेळी पुणे शहराच्या मध्यवस्तीतील डी-मोरा पबमध्ये भारत पाकिस्तान क्रिकेट सामन्यावर बेटिंग घेणात येत असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली. त्यानुसार पथकाने रात्री उशिरा पबमध्ये छापा टाकून श्रीपाद यादव नामक बुकीला ताब्यात घेतले. तो पबमध्ये दोन्ही देशांतील क्रिकेट सामन्यावर बुकिंग घेऊन सट्टा घेत असल्याचे उघडकीस आले. यावेळी पोलिसांनी लाखो रुपयांची रोकड, मोबाईल, साहित्य जप्त केले आहे.

## ब्रिटनमधून आकर्षक भेटवस्तू पाठवितो सांगून पलावा येथील महिलेची 73 लाखांची फसवणूक




डोंबिवली : डोंबिवली जवळील शिळफाटा पलावा येथील एका महिलेशी समाज माध्यमातून मैत्री करुन गेल्या वर्षभराच्या काळात या महिलेचा विश्वास संपादन करुन ब्रिटन मधील एका टोळक्याने महिलेची ७३ लाख रुपयांची फसवणूक केली आहे. या फसवणूक प्रकरणी महिलेने मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करुन तपास सुरू केला आहे. दीपिका भोलेशंकर पांडे (२९, रा. क्रेस्टीया कासाबेला गोल्ड, पलावा, डोंबिवली पूर्व) असे तक्रारदार महिलेचे नाव आहे. डॅनियल जोन्स, फ्रँक विल्सन, जॅक्सन वुन, रियाझ अशी आरोपींची नावे आहेत. हे सर्व ब्रिटन मधील रहिवासी आहेत. नोव्हेंबर २०२१ ते जुलै २०२२ या कालावधीत या टोळक्याने दीपिका पांडे यांच्याशी संपर्क ठेऊन ऑनलाईन व्यवहारातून त्यांची फसवणूक केली आहे. पोलिसांनी सांगितले, दीपिका पांडे यांच्याशी आरोपी इसमांनी गेल्या वर्षी समाज माध्यमाच्या साहाय्यातून संपर्क ककरण्यास सुरुवात केली. आपण ब्रिटन मधून बोलतो. असे सांगून त्यांनी दीपिका बरोबर संवाद आणि संपर्क वाढविला. दीपिका आणि आरोपी यांचे नियमित व्हाॅट्सप संपर्कातून बोलणे होत होते. या बोलण्यातून आरोपींनी दीपिकाचा विश्वास संपादन केला. दीपिका यांना आम्ही तुम्हाला ब्रिटन मधून आकर्षक भेट वस्तू पाठवितो, असे सांगितले. दीपिकाने त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवला. आकर्षक भेट वस्तू कुरियरने येणार म्हणून त्या वाट पाहत बसल्या. काही दिवसांनी दीपिकाला रियाझ, डॅनियल, जॅक्सन, फ्रँक यांनी आलटूपालटून संपर्क करुन आम्ही तुम्हाला महागडी आकर्षक भेट वस्तू पाठविली आहे. पण ही वस्तू सीमा शुल्क विभागाने पकडली आहे. या वस्तुचे सीमा शुल्क भरल्या शिवाय तुम्हाला वस्तू मिळणार नाही असे सांगितले. यासाठी दीपिका यांना त्यांच्या बँक खात्यामधून विविध टप्प्यात एकूण ७३ लाख आठ हजार रुपये रक्कम वळती करण्यास भाग पाडले. पूर्ण रक्कम सीमा शुल्क विभागाकडे भरल्यानंतरच वस्तू ताब्यात मिळणार असे भामट्यांनी दीपिकाला सांगितले होते. या आशेने दीपिकाने पूर्ण रक्कम भरणा केल्यानंतर आता वस्तू आपणास मिळणार या आशेवर राहिल्या. रक्कम भरणा करुनही वस्तू १५ दिवस झाली तरी घरी आली नाही. तसेच नियमित संपर्कात असलेले मित्र आपणास प्रतिसाद देत नाहीत. दीपिकाला उत्तर देण्यास त्यांनी टाळाटाळ सुरुवात केली. आपणाशी संपर्क ठेवणारे हे मित्र नव्हते तर ते भामटे होते, हे उशिरा लक्षात आल्यावर दीपिकाने मानपाडा पोलीस ठाण्यात फसवणुकीची तक्रार केली.

## चॉकलेटचे आमिष दाखवून अहमदनगरमध्ये सात वर्षीय चिमुकलीवर अत्याचार



अहमदनगर : अंगणात खेळणाऱ्या सात वर्षीय मुलीला पाणीपुरी, चॉकलेट आणि चिप्सचे आमिष दाखवून तिच्यावर अनैसर्गिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना अहमदनगरमध्ये घडली आहे. पीडित मुलीच्या आईने कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून युसूफ हमीद कुरेशी याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. युसूफ कुरेशीला अहमदनगरच्या कोतवाली पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलीची आई मोलमजुरीचे काम करते. युसूफ कुरेशी हा नराधम तिला तीन ते चार दिवसांपासून पाणीपुरी, चॉकलेट, चिप्स देत होता. गणेश चतुर्थीनिमित्त शाळेला सुट्टी असल्याने पीडीत मुलगी घरीच होती. पीडितेची आई कामावर गेल्याची संधी साधून युसूफने मुलीला दुचाकीवरून एका मंगलकार्यालयात घेऊन गेला. त्यानंतर या नराधमाने मुलीवर अत्याचार केले. याबाबत मुलीच्या आईला समजताच त्यांनी तातडीने नातेवाईकांशी संपर्क केला. मुलीच्या आईने चाईल्ड लाईन संस्थेला देखील याबद्दल माहिती दिली.




हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्कः-9594418181 / 8424989898